## फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक ६९/२०१७ मधील निशाण ६ वरील आदेश

१. थकित पोटगी रक्कम रुपये ३०,०००/– ची वसूली सामनेवाला यांचे निवृत्ती वेतनातून करण्यात यावी, या साठी अर्जदार हिने प्रस्तूत अर्ज दिला आहे.

२. सामनेवाला यांनी त्याच अर्जावर म्हणणे देऊन कथन केले की, त्यांचे निवृत्ती वेतन मिळण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे अर्जदार हिने सादर केलेली नाहीत व निवृत्ती वेतन अडवून ठेवले आहे. त्यामुळे, प्रस्तूत अर्ज नामंजूर करण्यात यावा, असे सामनेवाला यांचे कथन आहे.

३. उभय सुविद्य वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तूत अर्जावरील दिनांक ३/८/२०१९ रोजीच्या आदेशानुसार सामनेवालाच्या निवृत्ती वेतनाबाबत तपशिल सादर करण्यासाठी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना समन्स पाठविण्यात आले होते. त्यानुसार निशाण ८ येथे जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी तपशिल सादर केला आहे. त्या तपशिलाचे अवलोकन करता सामनेवाला याने खोटी जन्म तारीख सादर करुन जास्त काळ शासन सेवेत राहिल्याने त्याचा भाऊ पुंडलीक वाघाटे याने केलेल्या तक्रारीनुसार तत्कालीन निवासी उप जिल्हाधिकारी यांनी केलेल्या पडताळणीवरून सामनेवाला याची जन्म तारीख १/६/१९५७ नसून ती १/१०/१९४८ अशी असल्याचे व सामनेवाला याने आठ वर्षे आठ महिने जादा शासन सेवा केल्यामुळे रक्कम रुपये २०,३३८९२/– वेतन व भत्ते वसूलीस पात्र असल्याचे व त्यानुसार सुधारीत सेवा निवृत्ती सेवा परिगणना करण्यात आल्याचे तपशिलात नमूद आहे. सदर वसूलपात्र रक्कम देय रक्कमेतून वसूली करण्यात येणार असल्याने सामनेवाला यांनी महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण यांचेकडे दावा दाखल केला असून त्याबाबत कार्यवाही प्रलंबित असल्याचे तपशिलात नमूद आहे.

५. सामनेवाला याचेकडून जादा शासन सेवेबाबत वेतन व भत्ते वसूल होण्यास पात्र आहेत अगर कसे व ते कोणत्या प्रकारे वसूल करायचे हा प्रस्तूत अर्जाचा तसेच प्रस्तूत न्यायालयासमोरील विषय नाही. निशाण ८ येथील तपशिलानुसार सामनेवाला याच्या सुधारित सेवा निवृत्ती परिगणनेनुसार त्यांना निवृत्ती वेतन रुपये

४,३०५/–, उपदान रुपये ७५,३३८/– व अंशराशीकरण रुपये १,६९,३२१/– देय असल्याचे नमूद आहे. प्रस्तूत प्रकरणी अभिलेखाचे अवलोकन करता सामनेवाला यांनी निशाण १ येथील अर्जात नमूद थकीत पोटगी रक्कम रु.३०,०००/– पैकी कोणतीही रक्कम आज अखेर अदा केलेली नाही ही बाब स्पष्ट होते. सबब, सामनेवाला यास देय असलेल्या निवृत्ती वेतन रक्कमेतून सदर थकीत पोटगी रक्कम वसूल करण्याचा अर्जदार हिला हक्क आहे. त्यामुळे, पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आ दे श

१. निशाण ६ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला यांना देय असलेल्या निवृत्ती वेतन रक्कमेतून दरमहा रक्कम रुपये २,५००/– नुसार थकीत पोटगी रक्कम रुपये ३०,०००/– वसूलीपोटी कपात करण्यात यावेत व सदर रक्कम अर्जदार हिला थकीत पोटगी पोटी अदा करण्यासाठी या न्यायालयात ''**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, लांजा**'' यांचे नावे धनादेशाने पाठविण्यात यावी, असा आदेश जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना देण्यात येत आहे.

३. या नुसार जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना पत्र पाठविण्यात यावे.

Digitally signed by Girish Madhukar Sadhale
Date: 2021.02.17 16:02:32 +0530

**दिनांक १६/०२/२०२१** **(जी.एम.साधले)**

**ठिकाण लांजा.** **न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, लांजा,**
**ता.लांजा, जि.रत्नागिरी**

*Case No : Cri M A No 69 of 2017*
*I affirm that the contents of this pdf file Judgment/Order are same words as per original Judgment,*
*Court Name: Civil & Criminal Court, Lanja, Dist.Ratnagiri,*
*Date of decision :16/02/2021.*
*Judgment/Order signed by P.O.on : 16/02/2021.*
*Judgment/Order uploaded on :17/02/2021.*